MCAER
कृषि परिषद

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद,

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

ई मेल- mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८

संकेतस्थळ- www.mcaer.org

वाचाः- १. कृषि परिषद कार्यालाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/३९१५/२८८, दि.११/२/२०१६
२. कृषि परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/प्र.क्र.९१६/५६८, दि.१८/३/२०१६
३. कृषि परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५५१२/८५०, दि.२०/४/२०१६
४. कृषि परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/९१६/१०८०, दि.९/५/२०१६
५. कृषि परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/९१६/११८०, दि.२०/५/२०१६
६. कृषि परिषद कार्यालयाचे शुध्दीपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/३९१५/८९०, दि.१३/४/२०१७
७. कृषि परिषदेच्या दि. २९/५/२०२३ रोजीच्या ११० व्या बैठकीतील ठराव क्र.१४/११०/दि.२९/०५/२०२३
८. कृषि परिषदेचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१७२३/१६९०/२०२३, दि. २२/०६/२०२३
९. कृषि परिषदेच्या दि.१३/०७/२०२३ रोजीच्या १११ व्या बैठकीमधील विषय क्र.१ मधिल सुधारणा
१०. कृषि परिषद कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१७२३/१५८/२१९२, दि.९/८/२०२३.
११. कृषि परिषदेच्या दि. ०२/०३/२०२६ रोजीच्या १२२ व्या बैठकीमधील विषय क्र.१३ अन्वये ठराव क्र.१०/१२२/दि.०२/०३/२०२६.

---

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/४२६/२२५/९६७/२०२६ दि. ३० मार्च, २०२६

## प रि प त्र क

**विषयः- नवीन विना अनुदान तत्वावरील कृषि व संलग्न महाविद्यालयांच्या परवानगीसाठी द्यावयाच्या अर्जाच्या प्रस्तावाची छाननी, नवीन तुकडीवाढ व महाविद्यालयाचे रूपांतर इत्यादीबाबतची शुल्क व नवीन पदवी महाविद्यालय सुरु करण्यासाठी सुधारीत प्राथमिक कार्यपध्दती व निकष निश्चितीबाबत.**

कायमस्वरूपी विना अनुदानित महाविद्यालयांच्या मान्यतेसंदर्भात प्रस्तावांची छाननी करणे, प्रस्तावांमध्ये त्रुटी असल्यास त्या त्रुटी पूर्ततेविषयक कार्यवाही करणे, नवीन महाविद्यालयांना परवानगी देणे, तुकडीवाढ, महाविद्यालयांचे एका विद्याशाखेतून दुसऱ्या विद्याशाखेत रुपांतरण इत्यादी अनेकविध प्रक्रियेकरीता कृषि परिषद कार्यालयाकडून उपरोक्त संदर्भिय विविध परिपत्रकांन्वये कार्यपध्दती, निकष व शुल्क निश्चित करण्यात आलेले आहेत.

खाजगी संस्थेकडून विना अनुदानित तत्वावरील महाविद्यालये सुरु करण्यासाठी प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांबाबत कार्यवाही करताना / संस्थेकडून महाविद्यालय सुरु करण्यास असमर्थता दर्शविली असल्यास / विद्यापीठाने प्रस्ताव नाकारला असल्यास अशा प्रकरणी संस्थेकडून छाननी / प्रक्रिया शुल्काची रक्कम परत मिळणेविषयी विनंती अर्ज कृषि परिषद कार्यालयास प्राप्त होत असतात. तथापि, कृषि परिषदेच्या दि.०९/०८/२०२३ रोजीच्या परिपत्रकातील नवीन कृषि व संलग्न महाविद्यालयांना परवानगी देण्यासाठीच्या अर्ज व माहिती पुस्तिकेचे शुल्क, छाननी शुल्क, प्रक्रिया शुल्क, अनामत रक्कम इत्यादींच्या अनुषंगाने कार्यवाही करताना तांत्रिक अडचणी उद्‌भवत असल्याने दि.०९/०८/२०२३ रोजीच्या परिपत्रकामधील आर्थिक बाबी संबंधी कृषि परिषदेच्या १२२ व्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन बदलाबाबत ठराव पारीत करण्यात आला आहे.

त्यास अनुसरुन, नवीन विना अनुदान तत्वावरील कृषि व संलग्न महाविद्यालयांच्या परवानगीसाठी द्यावयाच्या अर्जाच्या प्रस्तावाची छाननी, नवीन तुकडीवाढ व महाविद्यालयाचे रूपांतरण इत्यादीबाबतचे सुधारित शुल्क व नवीन पदवी महाविद्यालय सुरु करण्यासाठी सुधारीत प्राथमिक कार्यपध्दती व सुधारित निकष खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहेत.

**अ) <u>नवीन कृषि व संलग्न महाविद्यालयासाठी निकष-</u>**

(१) ज्या संस्थेची कृषि किंवा संलग्न महाविद्यालये अस्तित्वात आहेत, अशा संस्थेस इतर विद्याशाखेचे कायमस्वरूपी विना अनुदानित नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे असल्यास अस्तित्वात असलेली सर्व महाविद्यालये 'अ' किंवा 'ब' दर्जाची असावीत.

(२) एका संस्थेस एकाच ठिकाणी एकाच विद्या शाखेतील एका महाविद्यालयांपेक्षा जास्त महाविद्यालये मान्य करण्यात येणार नाहीत.

(३) ज्या विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहे, त्या विद्याशाखेचे महाविद्यालय प्रस्तावित नवीन महाविद्यालयाच्या ५० कि.मी. च्या परिसरामध्ये नसावे. (याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचा दाखला ग्राह्य असेल.)

(४) भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या **पाचव्या अधिष्ठाता** समितीच्या शिफारशींच्या धर्तीवर शासन पत्र क्र. मकृप-१०२१/प्र.क्र.१४६/७-अे, दि.०९/१२/२०२१ अनुसार निश्चित केलेल्या निकषानुसार जमीन, प्रवेश क्षमता, शिक्षक-शिक्षकेतर पदे, मूलभूत सोयी-सुविधा, उपकरणे, इमारती इत्यादी बाबींची पूर्तता करणे अनिवार्य असेल.

**<u>नवीन महाविद्यालयासाठी कार्यपध्दती व शुल्क निश्चिती-</u>**

१) नवीन महाविद्यालय सुरु करण्यास इच्छुक असलेल्या संस्थेने कृषि व संलग्न महाविद्यालय सुरु करणेबाबतचा संस्थेचा विनंती अर्ज कृषि परिषद कार्यालयास सादर करावा. संस्थेकडून कृषि परिषद कार्यालयास प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने, नवीन महाविद्यालयाचा विहित अर्ज व माहिती पुस्तिका संस्थेस उपलब्ध करून देण्यात येईल. त्याकरीता कृषि परिषद कार्यालयामार्फत रू.५०००/- (रुपये पाच हजार) **(ना परतावा)** इतके शुल्क आकारण्यात येईल. **तथापि, सदर अर्जाची वैधता संस्थेस अर्ज दिल्यापासून एक वर्षासाठी असेल.**

२) संस्थेचा नवीन कृषि व संलग्न महाविद्यालयाच्या मागणीचा विहीत नमुन्यातील परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसहीत व छाननी शुल्कासहीत कृषि परिषद कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सदर प्राप्त प्रस्तावाची प्राथमिक छाननी कृषि परिषद कार्यालय स्तरावर संचालक शिक्षण विभागामार्फत करण्यात येईल. याकरीता रु.५.०० लाख (रु.पाच लाख) शुल्क आकारण्यात येईल. **सदर शुल्काची रक्कम ना परतावा असेल.** सदर शुल्क संस्थेने धनाकर्षाद्वारे / आरटीजीएसद्वारे वित्तीय सल्लागार, कृषि परिषद कार्यालयाकडे जमा करावे.

**३) कृषि परिषद स्तरावर संस्थेकडून प्राप्त प्रस्तावाची प्राथमिक छाननी झाल्यावर प्रस्ताव योग्य / अयोग्य बाबतचा निर्णय कृषि परिषद कार्यालयाकडून संस्थेस १ महिन्याच्या आत कळविण्यात येईल.**

४) संस्थेचा परिपूर्ण प्रस्ताव चार प्रतींमध्ये सादर करावा, त्यापैकी प्रस्तावाच्या तीन प्रती संबंधीत विद्यापीठाकडे प्रत्यक्ष तपासणी व पडताळणी करणेसाठी कृषि परिषद कार्यालयाकडून पाठविण्यात येतील. **याकरीता प्रक्रिया शुल्क रू. ५.०० लाख (रुपये पाच लाख) राहील, संस्थेने सदरचे शुल्क संबंधित कृषि विद्यापीठाचे नियंत्रक / शिक्षण संचालक यांचेकडे धनाकर्षाद्वारे / आरटीजीएसद्वारे भरावयाचे आहे. सदरची रक्कम कोणत्याही परिस्थितीत ना-परतावा असेल.**

५) उपरोक्तप्रमाणे, कृषि परिषद कार्यालयाकडून विद्यापीठास पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, विद्यापीठस्तरीय तपासणी समिती प्रस्तावित महाविद्यालयास / संस्थेस भेट देईल व त्याबाबतचा पडताळणी अहवाल विद्यापीठाच्या विद्या परिषद व कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने अभिप्रायासह कृषि परिषद कार्यालयास सादर करेल.

६) प्रस्तावित महाविद्यालयाच्या मान्यतेच्या अनुषंगाने, संबंधित विद्यापीठाकडून प्राप्त अहवाल / **प्रस्ताव कृषि परिषदेच्या बैठकीमध्ये सादर करण्यात येईल.**

७) कृषि परिषदेच्या बैठकीतील निर्णय / ठराव, संबंधीत विद्यापीठाकडून प्राप्त तपासणी समिती अहवालासहीत शासनास सादर करण्यात येईल.

८) शासनाकडून संस्थेस नवीन विना अनुदानित कृषि व संलग्न महाविद्यालय स्थापन करणेस परवानगी मिळाल्यानंतर **संस्थेने संबंधित कृषि विद्यापीठाकडे रु.१०.०० लाख (रुपये दहा लाख) रकमेची संयुक्त मुदत ठेव (Joint FD) बँकेमध्ये जमा करावी. याशिवाय संबंधीत नवीन महाविद्यालयासाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार नाही.**

९) महाविद्यालयाचा प्रस्ताव कृषि परिषद व शासनामार्फत काही त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवर मान्य झाला असेल तर अशा प्रकरणी मान्यता मिळाल्यापासून पुढील १ वर्षाच्या कालावधीत त्रुटी पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील. त्रुटी पूर्तता केल्याशिवाय पुढील प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार नाही.

**१०)** संस्थेला महाविद्यालय स्थापनेसाठी आवश्यक सोयी-सुविधा, (प्रयोगशाळा, वसतीगृह, स्वच्छतागृहे, जिमखाना, सीसीटीव्ही, प्रात्याक्षिक क्षेत्र इ.) व इतर अनुषंगिक सोयी-सुविधा महाविद्यालयास मान्यता मिळाल्यापासून पुढील पहिल्या वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे अनिवार्य आहे. सदर सोयी-सुविधांची पूर्तता झाल्याचा कृषि विद्यापीठाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील शैक्षणिक वर्षात अशा महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.

११) **संस्था स्वतःहून महाविद्यालय बंद करण्यास इच्छुक असेल / विद्यापीठामार्फत महाविद्यालयाची मान्यता रद्द झाल्यास अशा प्रकरणी त्या महाविद्यालयातील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांचा पदवी प्राप्त करण्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर तसेच महाविद्यालयाकडे कोणत्याही विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे काही देय नसलेबाबत महाविद्यालयाने विद्यापीठास कळविल्यानंतरच सदर संस्थेची संयुक्त मुदत ठेव (Joint FD) विद्यापीठाकडून रद्द करण्यात येईल अणि संस्थेची FD ची मूळ रक्कम बिनव्याजी संस्थेला परत करण्यात येईल.**

**ब) <u>कृषि व संलग्न महाविद्यालयाच्या तुकडीवाढचे निकष-</u>**

१. महाविद्यालय सुरु होऊन किमान चार वर्षे पूर्ण झालेली आणि **'अ'** किंवा **'ब'** दर्जा प्राप्त महाविद्यालये दुसरी तुकडी मंजूर करण्यास पात्र असतील.

२. कोणत्याही प्रकरणी तिसरी तुकडी मंजूर करण्यात येणार नाही.

३. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या **पाचव्या अधिष्ठाता** समितीच्या शिफारशींच्या धर्तीवर शासन पत्र क्र. मकृप-१०२१/प्र.क्र.१४६/७-अे, दि.०९/१२/२०२१ अनुसार निश्चित केलेल्या निकषानुसार जमीन, प्रवेश क्षमता, शिक्षक-शिक्षकेतर पदे, मूलभूत सोयी-सुविधा, उपकरणे, इमारती इत्यादी बाबींची पूर्तता करणे अनिवार्य असेल.

**<u>तुकडीवाढीसाठी कार्यपध्दती व शुल्क निश्चिती-</u>**

१. उपरोक्त मुद्दा '**ब**' मधील तुकडीवाढचे निकष तसेच तुकडीवाढीसाठी मागणी करणाऱ्या महाविद्यालयाची यापूर्वीची प्रवेश क्षमता पूर्ण आहे किंवा कसे? याची पडताळणी करूनच तुकडीवाढ करण्यात येईल.

(i) यासाठी ६० विद्यार्थी प्रतीवर्ष प्रवेश क्षमतेने तुकडीवाढीसाठी रू.८.०० लाख (रुपये आठ लाख) प्रक्रिया शुल्क.

(ii) ५० विद्यार्थी प्रतीवर्ष प्रवेश क्षमतेने तुकडीवाढीसाठी रू.६.०० लाख (रुपये सहा लाख) प्रक्रिया शुल्क.

(iii) ४० विद्यार्थी प्रतीवर्ष प्रवेश क्षमतेने तुकडीवाढीसाठी रू.५.०० लाख (रुपये पाच लाख) प्रक्रिया शुल्क निश्चित करण्यात येत आहे. संस्थेने सदरचे शुल्क वित्तीय सल्लागार, कृषि परिषद यांचेकडे प्रस्तावासोबत धनाकर्षाद्वारे / आरटीजीएसद्वारे भरावयाचे आहे.

२. संस्थेकडून तुकडीवाढसाठी प्राप्त प्रक्रिया शुल्कापैकी कृषि परिषद कार्यालयाकडून खालीलप्रमाणे रक्कम संबंधित कृषि विद्यापीठाकडे वर्ग करण्यात येईल व उर्वरीत रक्कम कृषि परिषद कार्यालयाकडे ठेवणेत येईल.

I) ६० प्रवेश क्षमतेसाठी रु.८.०० लाख (रुपये आठ लाख), पैकी रु.५.०० लाख (रुपये पाच लाख) संबंधित कृषि विद्यापीठाकडे व रु.३.०० लाख (रुपये तीन लाख) कृषि परिषद कार्यालयाकडेच राहतील.

II) ५० प्रवेश क्षमतेसाठी रु.६.०० लाख, (रुपये सहा लाख) पैकी रु.४.०० (रुपये चार लाख) लाख संबंधित कृषि विद्यापीठाकडे व रु.२.०० लाख (रुपये दोन लाख) कृषि परिषद कार्यालयाकडेच राहतील.

III) ४० प्रवेश क्षमतेसाठी रु.५.०० लाख (रुपये पाच लाख), पैकी रु.३.०० (रुपये तीन लाख) संबंधित कृषि विद्यापीठाकडे व रु.२.०० लाख (रुपये दोन लाख) कृषि परिषद कार्यालयाकडेच राहतील.

**सदरचे शुल्क ना-परतावा असेल.**

३. वाढीव तुकडीसाठी पात्र असलेल्या महाविद्यालयांनी कृषि परिषद कार्यालयाकडे मागणी अर्ज व उपरोक्त नमुद तुकडीवाढ प्रक्रिया शुल्कासह प्रस्ताव सादर करावा.

४. संस्थेकडून प्राप्त प्रस्ताव व उपरोक्तप्रमाणे प्रक्रिया शुल्क कृषि परिषद कार्यालयाकडून संबंधित कृषि विद्यापीठाकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येतील.

५. तुकडीवाढच्या अनुषंगाने, संबंधित कृषि विद्यापीठाकडून विद्या परिषद व कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने प्राप्त अहवाल / प्रस्ताव कृषि परिषदेच्या बैठकीमध्ये सादर करण्यात येतील. कृषि परिषद तुकडीवाढ मंजुरीबाबत योग्य तो निर्णय घेईल.

६. तुकडीवाढीचा प्रस्ताव काही त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवर मान्य झाला असेल तर अशा प्रकरणी तुकडीवाढीस मान्यता मिळाल्यापासून पुढील १ वर्षाच्या कालावधीत त्रुटी पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील. त्रुटी पूर्तता केल्याशिवाय वाढीव तुकडीसाठीची पुढील प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार नाही.

७. वाढीव तुकडीसाठी खाजगी संस्थांनी प्रयोगशाळा, वसतीगृह इत्यादी अनुषंगिक सोयी-सुविधा पहिल्या वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे अनिवार्य आहे. सदर सोयी-सुविधांची पूर्तता झाल्याचा कृषि विद्यापीठाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील शैक्षणिक वर्षात अशा महाविद्यालयांमध्ये वाढीव तुकडीसाठीची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.

**क) <u>कृषि व संलग्न महाविद्यालयाच्या रूपांतराचे निकष -</u>**

१. ज्या विद्याशाखेच्या महाविद्यालयामध्ये रूपांतर करावयाचे आहे, त्या विद्याशाखेचे महाविद्यालय प्रस्तावित नवीन महाविद्यालयाच्या ५० कि.मी. च्या परिसरामध्ये नसावे. (याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचा दाखला ग्राह्य असेल.)

२. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या **पाचव्या अधिष्ठाता** समितीच्या शिफारशींच्या धर्तीवर शासन पत्र क्र. मकृप-१०२१/प्र.क्र.१४६/७-अे, दि.०९/१२/२०२१ अनुसार निश्चित केलेल्या निकषानुसार जमीन, प्रवेश क्षमता, शिक्षक-शिक्षकेतर पदे, मूलभूत सोयी-सुविधा, उपकरणे, इमारती इत्यादी बाबींची पूर्तता करणे अनिवार्य असेल.

**<u>महाविद्यालयाच्या रूपांतरासाठी कार्यपध्दती व शुल्क निश्चिती -</u>**

(१) सदर संस्थेने सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयाची मान्यता रद्द करून रूपांतर करावयाच्या इतर विद्याशाखेमधील महाविद्यालयाच्या मान्यतेसाठी कृषि परिषद कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावा.

(२) **संस्थेने कृषि परिषद कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करतेवेळी रु.८.०० लाख (रुपये आठ लाख) प्रक्रिया शुल्क जमा करावे. संस्थेकडून प्राप्त प्रस्ताव व रु.८.०० लाख (रुपये आठ लाख) प्रक्रिया शुल्कातील रु.५.०० लाख (रुपये पाच लाख) कृषि परिषद कार्यालयाकडून संबंधित कृषि विद्यापीठास वर्ग करण्यात येतील आणि रु.३.०० लाख (रुपये तीन लाख) कृषि परिषद**

**कार्यालयाकडेच राहतील. सदर प्रक्रिया शुल्काची रक्कम कोणत्याही परिस्थितीत ना-परतावा असेल.**

(३) उपरोक्तप्रमाणे कृषि परिषद कार्यालयाकडून विद्यापीठास पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने, विद्यापीठस्तरीय तपासणी समिती प्रस्तावित महाविद्यालयास भेट देईल व त्याबाबतचा तपासणी समितीचा अहवाल विद्यापीठाच्या विद्या परिषद व कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने अभिप्रायासह कृषि परिषद कार्यालयास सादर करेल.

(४) महाविद्यालयाच्या मान्यतेच्या अनुषंगाने, संबंधित विद्यापीठाकडून विद्या परिषद व कार्यकारी परिषदेच्या मान्यतेने प्राप्त अहवाल / प्रस्ताव कृषि परिषदेच्या बैठकीमध्ये सादर करण्यात येईल.

(५) महाविद्यालयाचा प्रस्ताव कृषि परिषद व शासनामार्फत काही त्रुटींची पूर्तता करण्याच्या अटीवर मान्य झाला असेल तर अशा प्रकरणी मान्यता मिळाल्यापासून पुढील १ वर्षाच्या कालावधीत त्रुटी पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील. त्रुटी पूर्तता केल्याशिवाय पुढील प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार नाही.

(६) खाजगी संस्थांनी प्रयोगशाळा, वसतीगृह इत्यादी अनुषंगिक सोयी-सुविधा पहिल्या वर्षाच्या कालावधीत पूर्ण करणे अनिवार्य आहे. सदर सोयी-सुविधांची पूर्तता झाल्याचा कृषि विद्यापीठाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुढील शैक्षणिक वर्षात अशा महाविद्यालयांमध्ये प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येईल.

(७) महाविद्यालयाच्या रुपांतरणाचा प्रस्ताव कृषि परिषदेने मंजूर केल्यास रूपांतरापूर्वी अस्तित्वात असलेल्या विना अनुदानित महाविद्यालयाची मान्यता आपोआपच रद्द होईल. मात्र मान्यता रद्द करण्यात आली आहे, असे विद्यापीठाने संबंधित संस्थेस लेखी कळवावे. तसेच सदर महाविद्यालयाची पुढील प्रवेश प्रक्रिया थांबविण्यात आलेली आहे हे सुध्दा विद्यापीठाने कृषि परिषद कार्यालयास कळवावे. संबंधित मान्यता रद्द केलेल्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचा संपूर्ण शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करणे त्या महाविद्यालयावर बंधनकारक राहील. तसेच संस्थेच्या पूर्वीच्या **महाविद्यालयातील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांचा पदवी प्राप्त करण्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर तसेच महाविद्यालयाकडे कोणत्याही विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे काही देणे देय नसलेबाबत महाविद्यालयाने विद्यापीठास कळविल्यानंतरच सदर संस्थेची रुपांतरणापूर्वीच्या महाविद्यालयाची ठेव रक्कम संस्थेस परत मिळेल.**

(८) विद्यार्थ्यांची संख्या खूपच कमी असेल तर, विद्यापीठाच्या मान्यतेने व विद्यार्थ्यांच्या संमतीने, त्यांचे दुसऱ्या विना अनुदानित महाविद्यालयात स्थलांतरण करण्याची जबाबदारी मान्यता रद्द केलेल्या महाविद्यालयावर राहील.

(९) **महाविद्यालयास मान्यता मिळाल्यानंतर संस्थेने संबंधित कृषि विद्यापीठाकडे रु.१०.०० लाख (रुपये दहा लाख) रकमेची संयुक्त मुदत ठेव (Joint FD) बँकेमध्ये जमा करावी.**

(१०) **संस्था स्वतःहून महाविद्यालय बंद करण्यास इच्छुक असेल / विद्यापीठामार्फत रुपांतरीत महाविद्यालाची मान्यता रद्द झाल्यास अशा प्रकरणी त्या महाविद्यालयातील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांचा पदवी प्राप्त करण्याचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर तसेच महाविद्यालयाकडे कोणत्याही विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे काही देणे देय नसलेबाबत महाविद्यालयाने विद्यापीठास कळविल्यानंतरच सदर संस्थेची संयुक्त मुदत ठेव (Joint FD) विद्यापीठाकडून रद्द करण्यात येईल अणि संस्थेची संयुक्त मुदत ठेव ची मूळ रक्कम बिनव्याजी संस्थेला परत करण्यात येईल.**

नवीन विना अनुदानित कृषि व संलग्न महाविद्यालय, तुकडीवाढ व रूपांतरणाबाबतच्या निकषामध्ये काही विशेष परिस्थितीत विशेष बाब म्हणून काही बाबींमध्ये शिथीलता देण्याचे अधिकार मा.मंत्री (कृषि) तथा अध्यक्ष, कृषि परिषद यांचेकडे राखीव असतील.

सदरचे परिपत्रक निर्गमित झालेल्या दिनांकापासून लागू असेल तसेच नवीन महाविद्यालये / रुपांतरण आणि तुकडीवाढीची मागणी करणाऱ्या संस्था / महाविद्यालये तसेच राज्यातील कृषि विद्यापीठे यांनी उक्त सर्व बाबींची नोंद घ्यावी.

**(वर्षा लड्ढा-उंटवाल)**
**महासंचालक**

प्रतः-

(१) कुलसचिव / अधिष्ठाता (कृषि), महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, परिपत्रकातील सर्व बाबी विचारात घेऊन कार्यवाही करण्यात यावी. सदरचे परिपत्रक आपले अखत्यारीतीत सद्या कार्यान्वित संस्था तसेच नव्याने येवू इच्छीणाऱ्या सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून कृषि विद्यापीठाच्या सूचना फलक / संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे.

(२) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे यांना सूचित करण्यात येते की, कृषि परिषदेच्या राज्यस्तरीय कार्यक्षेत्रामधील सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषि परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.